# रे.दि.मु.क्र.४९/२०१५ मधील नि.क्र.१६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे समन्स प्रतिवादीस लागू झाल्यानंतर प्रतिवादींनी वादी वापरत असलेल्या ठिकाणची सिंगल फ्युज, बाहेरील एक फ्युज व आतील एक फ्युज काढून नेली. याबाबत वादीने उपअभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. जयसिंपूर यांचेकडे दि.०९/०४/२०१५ रोजी प्रतिवादीचे भाचे अमृत राजू हेरेकर यांनी कनेक्शन तोडल्याबाबत तक्रार अर्ज दिला. तसेच जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे देखील त्याची प्रत दिली. तरीही प्रतिवादीने सदर फ्युज बसविल्या नाहीत. सदरची बाब दावा दाखल केल्या नंतरची असल्यामुळे त्याबाबत दाव्यात दुरुस्ती करुन अज्ञार्थी मनाई मागणे वादीस आवश्यक झालेले आहे. वादीने सदर अमृत हेरेकर व उपअभियंता या दोघांना प्रतिवादी क्र.२ व ३ करण्याची परवानगी, तसेच वादपत्र परिच्छेद ३(अ) समाविष्ट करण्यास, परिच्छेद ४, ६ व ७ मध्ये दुरुस्ती करण्याची व विनंती कलम १०(ब)(१) समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यास परवानगी मागीतलेली आहे. प्रतिवादीचे म्हणणे नि.क्र.१९ वर आहे. त्याने अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. त्याचे कथन असे की, वादीच्या मालकीचे विज कनेक्शनशी त्याचा काहीही संबंध नाही. दावा मिळकतीच्या वर्णनात कोणत्या नंबरच्या विज कनेक्शन मधून वादीस विज पुरवठा होतो हे नमुद केलेले नाही. ज्यादा प्रतिवादी करण्याची विनंती विचारात घेता येणार नाही. अमृत हेरेकर हा व्यवसाय धंदया निमित्त पुणे येथे राहतो. त्याचा विज कनेक्शनशी काहीही संबंध नाही. अपघातामुळे प्रतिवादी क्र.१ माहेरी भावाकडे

आल्यामुळे विनाकारण विज बिल भरावे लागू नये म्हणून तिने विज मंडळाकडे कनेक्शन बंद करण्याबाबत कळविले होते. मात्र अद्याप ही ते कनेक्शन चालू आहे. वादीने खोटी दाद मागीतलेली आहे. सदर दुरुस्तीने दाव्याच्या स्वरुपात अमुलाग्र बदल होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

०३. अर्ज व म्हणणे तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर दाव्यात चौकशी सुरु झालेली नाही. त्यामुळे वादीस नंतर घडलेल्या घटनेबाबत दुरुस्ती मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. प्रतिवादी हे अमृत याचे करवी वादीस हरकत अडथळा करीत आहेत व उपअभियंता विद्युत मंडळ यांनी देखील त्यांना मदत केलेली आहे. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करणे आवश्यक झालेले आहे.

०५. याउलट प्रतिवादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर दुरुस्तीमुळे पुर्ण नवीन केस निर्माण होवून नवीन पक्षकार सामील होणार आहेत. यापुढे सदर घटनेबाबत दाव्याचे कारण हे प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर घडलेले आहे. त्यामुळे अशी दुरुस्ती मंजुर करता येणार नाही. सदर दुरुस्तीमुळे विनंती व दाव्याचे स्वरुप देखील बदलणार आहे. तसेच प्रतिवादीच्या पुर्वहक्कदारांचे नांवे असणा–या विज कनेक्शनशी वादीचा काहीही संबंध नाही. सदर विज कनेक्शन आज ही सुरु आहे. त्यामुळे वादीने खोटी दुरुस्ती मागीतलेली आहे. विनंती नामंजुर करण्यात यावी.

०६. प्रस्तुत प्रकरणात दाव्याची चौकशी सुरु झालेली नाही. वादी कथन करीत असलेली घटना दावा दाखल केल्यानंतरची आहे ही सर्वसाधारण मान्यवस्तुस्थिती आहे. अमृत हेरेकर हा प्रतिवादीचा भाचा असुन त्याच्या मार्फत विज कनेक्शनची फ्युज काढली असे वादीचे कथन आहे. त्यामुळे त्याला

स्वतंत्ररित्या वेगळ्या क्षमतेत वादी पक्षकार करण्याची विनंती करीत नसुन प्रतिवादी तर्फे इसम या क्षमतेमध्ये त्याने केलेल्या तथाकथीत कृतीबाबत त्याला व उपअभियंता यांना पक्षकार करण्याची वादीची विनंती आहे. यापुढे सदर दुरुस्ती अर्जाच्या वेळी वादी कथन करीत आहेत ते खोटे आहे का हे पाहण्याची आवश्यकता नाही. वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद कायमपणे मिटविण्याकरीता याच दाव्यात दुरुस्ती करणे योग्य व न्यायोचित होणार आहे. त्याकरीता स्वतंत्र दावा दाखल करावा लागल्यास त्यामुळे दाव्यांची अनेकता (Multiplicity of Proceedings) होणार आहेत आणि त्यामुळे सदर बाबीचा विचार करणे आवश्यक आहे.

०७. वादीच्या विधीज्ञांनी पुढीलप्रमाणे न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत.

1. **Mahila Ramkali Devi** & **Ors**.

**vs**.

**Nandram**(**D**) **Thr**.**Lrs**.& **Ors**.,**reported in** 2015(4)**ALL MR** 426(**S**.**C**.)

सदर न्यायनिर्णयात मा.सर्वोच्च न्यायालय यांनी असे निर्णीत केले आहे की, वाद कथन दुरुस्तीबाबत केवळ पक्षकारांनी malafide कृत्य करुन किंवा स्वतःच्या चुकीमुळे विरोधीपक्षास कॉस्टचे स्वरुपात नुकसानभरपाई देता येणार नाही अशी दुखापत केली असे असल्यास दुरुस्ती नाकारावी अन्यथः सर्व दुरस्त्या मंजुर करावयात.

2. **Sanjay Suganchand Kasliwal**

**vs**.

**Jugalkishor Chhaganlal Tapadia**,

**reported in** 2015(3)**Mh.L.J**.121

सदर न्यायनिर्णयात मा.बॉम्बे उच्च न्यायालय यांनी असे निर्णीत केले आहे की, पुर्ण न्याय करण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व दुरुस्त्या मान्य कराव्यात.

**3. Walchandnagar Industries Ltd.Mumbai**

**Vs.**

**Indraprastha Developers, Pune and others, reported in, 2015(3) Mh.L.J.786.**

सदर न्यायनिर्णयात मा.बॉम्बे उच्च न्यायालय असे निर्णीत केले आहे की, वाद कथनामध्ये दुरुस्ती कोणत्याही स्टेजला व अचीलामध्ये ही करता येऊ शकते.

०८. वर नमुद न्यायनिर्णय आणि प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती याचा विचार करता माझे मते मागणी केलेली दुरुस्ती मंजुर केल्यामुळे पक्षकारांमधील खराखुरा वादातीत प्रश्न अंतीमरित्या निर्णीत करण्यास व दाव्यांची अनेकता (Multiplicity of Proceedings) टाळण्यास मदत होणार आहे. त्याबाबत प्रतिवादीस कॉस्ट देणे माझे मते योग्य होईल. सबब वर नमुद कारणांकरीता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादीस रक्क्म रु. ५००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

सही/-

दि.१४/०७/२०१५. (म. ता. पाटणकर)

ठिकाणः जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,जयसिंगपूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Rahul Laxman Mane (L.G.) |
| Name of Court | Jt. Civil Court & J.M.F.C. Jaysingpur. |
| Date of Dictation | 14/07/15 |
| Judgment signed by the P.O. on | 20/07/15 |
| Judgment uploaded on | 20/07/15 |